धर्मराज्य पक्ष

अध्यक्ष
राजन राजे

संदर्भ क्र.________ दिनांक : ०४/०१/२०१६

प्रसिध्दीकरिता

# ‘धर्मराज्य पक्षा’तर्फे सावित्रीबाई फुलेंची जयंती उत्साहात साजरी, पक्षाध्यक्ष राजन राजे यांची प्रमुख उपस्थिती

**ठाणे (प्रतिनिधी), दि. ४** – ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांची १८४ वी जयंती **‘धर्मराज्य पक्षा’**च्यावतीने ठाण्यात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. **‘धर्मराज्य महिला संघटने’**चा **तिसरा वर्धापनदिन** व सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीचे औचित्य साधून, मांसुदा तलावाजवळील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या अर्धपुतळ्यास तसेच, सावित्रीबाईंच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी **‘धर्मराज्य पक्षा’**चे **अध्यक्ष राजन राजे** यांची प्रमुख उपस्थिती होती; तर, उच्च न्यायालयातील अॅड. अनुराधा शेटये प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या.

दरम्यान, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर आणि ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांना वंदन केल्यानंतर, **‘धर्मराज्य महिला संघटने’**च्यावतीने संपूर्ण नौपाडा परिसरात **‘स्त्रीजागृती रॅली’** काढण्यात आली. यामध्ये स्त्रीयांवरील वाढते अत्याचार, स्त्रीभ्रूण हत्या, स्त्री-शिक्षण आणि महिला सक्षमीकरण या विषयांवर जागृती करण्यात आली. याप्रसंगी, **धर्मराज्य महिला संघटनेच्या अध्यक्षा जयश्री पंडित** यांच्या नेतृत्वाखाली शेकडो महिला रॅलीमध्ये सहभागी झाल्या होत्या.

**‘धर्मराज्य पक्षा’**चे **अध्यक्ष राजन राजे** यावेळी म्हणाले की, “ज्ञानज्योती, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी केलेले स्त्री–शिक्षणाचे कार्य इतके मोठे आहे की, त्यांच्यामुळेच आजची स्त्री सर्वस्तरांवर अत्युच्च ठिकाणी विराजमान झालेली दिसते आहे. महिलांनी, पुरूषांच्या खांदयाला खांदा लावून कार्यरत राहण्याऐवजी, आता स्वत:ची वेगळी ओळख निर्माण केली पाहिजे; जेणेकरून, पुरूषप्रधान संस्कृतीच्या आधाराची गरजच त्यांना वाटू नये, असे बोलुन; याच पार्श्वभुमीवर, ‘धर्मराज्य महिला संघटना’ स्त्रीयांच्या पूर्ण सक्षमीकरणासाठी अविरतपणे कार्यरत असल्याचा आपल्याला सार्थ अभिमान आहे.” असेही राजन राजे यांनी शेवटी आपल्या भावना व्यक्त करताना म्हटले.

दरम्यान, या कार्यक्रमाला **‘धर्मराज्य पक्षा’**चे उपाध्यक्ष राजू सावंत, धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघाचे महासचिव महेशसिंग ठाकूर, सचिव रूपेश पवार, ठाणे लोकसभा सचिव विनोद मोरे, ऐरोली विधानसभा अध्यक्ष पांडुरंग गोरे तसेच, धर्मराज्य महिला संघटनेच्या सचिव साक्षी शिंदे, सहसचिव दर्शना पाटील, सदस्या स्वप्नाली पवार, नवी मुंबई शहर अध्यक्षा शितल कोळी, उपाध्यक्षा रेखा साळुंके, कामोठे समन्वयक शोभा म्हात्रे आदी पुरूष आणि महिला पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

ए/ए२०३, 'पांचजन्य'-२, रिगलप्लाझा-लोकपुरम प्रिमायसेस् को.ऑ.हौ. सोसायटी, ग्लॅडीज् अल्वारिस मार्ग, पोखरण रोड नं.२, ठाणे (प.)-४०० ६१०, दूरध्वनी : २२१७१ ६७२१ / ८१०८१ २५०००

७/६०१-६०२, 'पांचजन्य', शुभारंभ, फेज-१, कोकणी पाडा मार्ग, द्वारा-घोडबंदर रोड, मानपाडा, ठाणे (प.)-४०० ६१०. दूरध्वनी : ६५२७ ०००१ / २७७९ ०६७००

*“सर्व सामान्यांचं जीवन-मरण आणि पर्यावरण, हवं एवढयासाठीच राजकारण!”...*